

**कोल्हापूर : कमला महाविद्यालयात ग्रंथप्रदर्शनाची माहिती घेताना प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील. शेजारी ग्रंथपाल सौ. यू. आर. कदम व विद्यार्थिनी.**

# कमला महाविद्यालयात ग्रंथप्रदर्शन

कोल्हापूर, ता. २८ : ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयात ग्रंथालय विभाग व मेहता बुक्सतर्फे ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. ग्रंथपाल सौ. यू. आर. कदम यांनी एकाच ठिकाणी पाठ्यपुस्तके, कथा, कादंबरी, इतर पुस्तके उपलब्ध करून देण्याबरोबरच वैयक्तिक खरेदी, पाठ्यपुस्तकावर १५ टक्के व अन्य पुस्तकांवर २० टक्के सवलत दिल्याचे सांगितले. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, वाणिज्य, व्यवस्थापन, माहिती तंत्रज्ञान, संगणक, मराठी, स्पर्धा परीक्षा पूर्व व मुख्य परीक्षांसाठी उपयुक्त ग्रंथ पाहण्यास व विक्रीस ठेवले आहेत. ग्रंथालय समिती सदस्य प्रा. ए. एम. साळोखे, डॉ. सौ. बी. व्ही. शेळके, प्रा. रेखा पंडित, डॉ. सौ. अनघा पाठक, मेहता बुक्सचे प्रतिनिधी श्री. मणेर, विद्यार्थिनी उपस्थित होत्या.